उपोद्घात

रंगभूमी नियतकालिकाचा जन्म या घटनेची पार्श्वभूमी -

किर्लोस्कर नाटक मंडळीचे व्यवस्थापक श्री. शंकर बापूजी मुजुमदार यांनी १९०७ मध्ये रंगभूमी नियतकालिक सुरू केले. या घटनेमागील प्रेरणा कोणत्या होत्या त्याचा विचार प्रस्तुत प्रबंधाच्या संदर्भात महत्त्वाचा वाटतो. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील, महाराष्ट्राच्या जीवनातील घडामोडी हा एक प्रेरक बिंदू आणि कै. आण्णासाहेब किर्लोस्कर यांच्याशी व त्यांच्या किर्लोस्कर नाटक मंडळीशी, श्री. मुजुमदार यांचा आलेला निकट संबंध हा दुसरा प्रेरक बिंदू अशा दोन गोष्टी ठळकपणे नजरेपुढे येतात.

एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध हा महाराष्ट्राच्या जीवनातील नवजागृतीचा काळ होता. या शतकाच्या अखेरच्या टप्प्यात, सर्वक्षेत्रीय वैचारिक प्रबोधनाची लाट उसळली होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर, रानडे अशा विचारवंतांनी, साहित्य, शिक्षण, राजकारण, समाजकारण, धर्मकारण इत्यादी. संस्कृतीच्या विविध घटकांना नवा आशय प्राप्त करून देण्याचे प्रभावी प्रयत्न केले होते. या नव्या विचारांचे, नव्या जीवनदृष्टीचे बीजारोपण समाजमनात दृढपणे व्हावे यासाठी, लोकांपर्यंत पोहोचता येईल अशा सर्व महत्त्वाच्या साधनांचा वापर त्यांनी केला. वृत्तपत्र, छापखाना, शाळा-महाविद्यालयांची स्थापना, वैचारिक लेखन, विविध संस्थांची स्थापना, अशा सर्व मार्गांनी समाजमन घडविण्याची पराकाष्ठा झालेली होती. श्री. शं. बा. मुजुमदार यांचा ऐन तारुण्याचा कालखंड हा असा वैचारिक आवाहनाचा कालखंड होता. ध्येयवाद हा टिळकयुगाचा महामंत्र, समाजाला याच काळात मिळाला होता. त्याचप्रमाणे महाराष्ट्राची रसिकता पालवणारी एक अद्‌भुत घटनाही १८८० मध्ये घडली होती. कै. आण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या ‘ शाकुंतल च्या प्रयोगामुळे एक स्वप्नच सत्यसृष्टीत अवतरले होते.

१ ऑक्टोबर १८८० या दिवशी पुण्याच्या आनंदोद्भव नाटकगृहात झालेला ‘ शाकुन्तल चा पहिला प्रयोग ही केवळ नाट्य-रसिकांच्याच जीवनातील नव्हे तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील फार मोठी घटना ठरली. वयाच्या सातव्या वर्षापासून सांगलीकर नाटक

मंडळीच्या नाटकात भूमिका करणाऱ्या शंकरराव मुजुमदारांना आण्णासाहेब किर्लोस्करांनी आपल्याकडे आग्रहपूर्वक बोलावून घेऊन ‘शाकुंतल मध्ये शकुन्तलेची भूमिका दिली होती. आण्णासाहेबांच्या निकट सान्निध्यात त्यांचे असामान्य कर्तृत्त्व, रसिकता, गुणग्राहकता, नाट्यवेड या सगळ्या गोष्टींचे संस्कार मुजुमदार यांना लाभले होते. त्यांच्या मनोवृत्तीचे पोषण आण्णासाहेबांनीच केलेले होते. ‘ शाकुंतल च्या प्रयोगामुळे नाट्यक्षेत्रात निर्माण झालेले भारलेपण श्री. मुजुमदार यांनी अनुभवले होते. नाट्यक्षेत्राला, नाट्यव्यवसायातील मंडळींना, स्थिर स्वरूपाची सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होण्याच्या दृष्टीने, काही ठोस पाऊले उचलण्यास आण्णासाहेबांना सवडच मिळाली नाही. १८८५ मध्ये त्यांचे निधन झाले. आण्णासाहेबांच्या कार्यातील ताकद ओळखून स्पष्ट उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून ते जोमाने पुढे न्यावे असे मुजुमदार यांना वाटले. नाट्यलेखन आणि नाट्यप्रयोग एवढ्यापुरताच विचार न करता, नाटक हा समाजजीवनातील एक महत्त्वाचा घटक आहे, ती एक सामुदायिक कला आहे या दृष्टीने विचारमंथन झाले पाहिजे ही जाणीव त्यांना झाली. नाटकाच्या संदर्भात, कला आणि व्यवसाय यांचे परस्परपूरक नाते त्यांनी अचूक ओळखले होते.

काळाचा परिणाम यादृष्टीने आणखी एक गोष्ट अशी दिसते की, नाटक एक कलाप्रकार म्हणून त्याकडे लक्ष पुरवावे अशी जाणीव हळूहळू निर्माण होऊ लागली होती. एकेका विशिष्ट कलाप्रकाराचा विचार याच कालखंडात सुरू झाला होता. काव्य, नाटक, कादंबरी, निबंध या प्रत्येक कलाप्रकाराची स्वतंत्र ताकद, त्यातील सौंदर्य यांचे भान येऊ लागले होते. नाटक या कलाप्रकारातील अनन्यसाधारण घटकांचे महत्त्व स्वानुभवातून, चिंतनातून मुजुमदार यांना उमगले होते. अशारितीने विशिष्ट कालखंडाने दिलेले बौद्धिक बळ, आण्णासाहेबांनी संस्कारित केलेली रसिकता आणि नाट्यदृष्टी, किर्लोस्कर नाटक मंडळीचे व्यवस्थापक म्हणून मिळालेला स्वानुभव या पार्श्वभूमीवर नाट्यक्षेत्रात काही नवे घडवून आणण्याची उमेद निर्माण झाली.

ʻरंगभूमी नियतकालिक सुरू करताना, इंग्रजीतील स्टॅण्ड, थिएटर मॅगेझिन् यासारखी मासिके व पीपल्स् इन्स्टिट्यूटसारखी अमेरिकन संस्था यांचा आदर्श आपल्यापुढे होता असे मुजुमदार यांनी या नियतकालिकात नमूद केले आहे. परंतु मूळ प्रेरणा ती नव्हती; मूळ प्रेरणा होती, ती वर सांगितलेल्या परिस्थितीची त्याचबरोबर समकालीन वास्तवाचीही एखाद्या राजकीय सत्तेच्या सुवर्णकाळातच तिच्या विनाशाची बीजे रोवली जातात, तसे काही घडण्याची दुश्चिन्हे, मराठी रंगभूमीच्या सुवर्णकाळात मुजुमदार यांना दिसली होती.

रंगमंचावरील झगमगाटाच्या आतील बाजूची काळोखी त्यांच्यासारख्या डोळस नाट्यप्रेमी व्यक्तीला व्यथित करीत होती. ही काळोखी, हा अंध:कार होता नटांच्या अज्ञानाचा, अशिक्षितपणाचा, नाटककारांमधील मतभेदांचा, नाटकमंडळीमध्ये सत्ता मिळावी म्हणून चालणाऱ्या स्पर्धेचा बहुसंख्य प्रेक्षकांच्या अभिरुचीची सामान्य पातळी, काही वेळा त्यांच्या ठिकाणी दिसणारा जबाबदारीचा अभाव, नाटक मंडळ्यांना आश्रय देणाऱ्या काही संस्थानिकांचा लहरीपणा, परकीय सरकारची नाटक धंद्यावर वक्रदृष्टी, अशा अनेक अडचणींच्या छायेत, आण्णासाहेब किर्लोस्करांनी लावलेले 'केशराचे शेत उभे होते. ते सदोदित फुलत राहण्यासाठी नाटक या विषयावर सर्वांगाने विचारमंथन होणे, मुजुमदार यांना आवश्यक वाटले. नट, नाटककार, प्रेक्षक या सगळ्यांनाच अभिनव नाट्यदृष्टी देण्याची गरज होती. ज्यांच्या ज्यांच्या जवळ सकस विचार होते, ते चौफेर पेरीत जाण्याची गरज होती. व्यासंगी विद्वानांबरोबरच सामान्य प्रेक्षकालाही या प्रक्रियेत सामावून घेऊन त्याचा आदर राखणे जरुरीचे होते. कारण अखेर नाटक हे नाट्याभ्यासक रसिकाग्रणींपासून ते सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यंत साऱ्यांचे असते; साऱ्यांसाठी असते. याहीपलीकडे जाऊन हा 'खेळ' मांडलेला असतो तो मानवजातीसाठी मराठी नाट्यसृष्टीचे क्षितिज इतके विस्तारत न्यायचे असेल तर जाणीवपूर्वक वैचारिक चलनवलन सुरू केले पाहिजे हे मुजुमदार यांना मनोमन उमगले. मराठी नाट्यसृष्टीच्या अभ्युदयासाठी त्यांनी निर्माण केलेले विचार व्यासपीठ म्हणजेच रंगभूमी नियतकालिक विशिष्ट पार्श्वभूमीवर या नियतकालिकाचा उदय झाला आणि तिनेच त्याचे स्वरूपही आपोआपच निश्चित केले.

रंगभूमी नियतकालिकाचे स्वरूप :

या नियतकालिकातील नाट्यविषयक लेखनाचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. नाटक या कलाप्रकाराच्या जवळजवळ सर्व अंगोपांगांवर यात काही ना काही लिहिले गेले आहे. नट, नाटककार, नाटकमंडळ्या, प्रेक्षक, नाट्यव्यवसाय, नाट्यगृह, नाटकाचे टीकाकार असे अनेक विषय यात आलेले आहेत. यावर कधी गंभीरपणे विचार व्यक्त केले गेले आहेत तर कधी विनोदाच्या माध्यमातून उपहास-उपरोधपूर्ण टीका केलेली आहे. वाचकांच्या पत्रव्यवहारातून काही सूचना, निरीक्षणे, टीका आलेली आहे. स्फुट लेखनातून, विविध सदरांमधून मते व्यक्त केलेली आहेत. नाट्यविषयक तात्त्विक लेख, संहितासमीक्षा, प्रयोगसमीक्षा, नाट्य-संमेलनाध्यक्षांची भाषणे यातून सर्वात अधिक नाट्यचिंतन झालेले आढळते. माहिती, निरीक्षणे, इतिहास, नाट्यचिंतन, समकालीन प्रश्नांची चर्चा हे सारे

अभिव्यक्तीच्या वेगवेगळ्या माध्यमांतून आलेले असल्याने आशयाची पातळीही त्यानुसार बदललेली दिसते. बहुविध स्वरूपाची नाट्यविषयक माहिती आणि भिन्न लेखनप्रकार असे याचे स्वरूप आहे. हे नियतकालिक सचित्र आहे. नट, नाटककार, नाट्यप्रयोगाला रंगत आणणारे काही प्रसंग इत्यादीची चित्रे यात आहेत. नट, नाटककार यांची चरित्रे, विविध प्रकारच्या सूच्या किंवा याद्या यांचाही अंतर्भाव यात केलेला आहे. केवळ नाटक या विषयाला वाहिलेले मराठीतील पहिले सचित्र नियतकालिक हे बिरूद अभिमानाने सांगावे असे याचे स्वरूप भरगच्च आहे.

रंगभूमी नियतकालिकाच्या अभ्यासाच्या विविध शक्यता :

या नियतकालिकाचे स्वरूप पाहिल्यावर त्याच्या अभ्यासाच्या विविध शक्यता जाणवतात. उदाहणार्थ याच्या समकालीन व पूर्वकालीन नियतकालिकांतील नाट्यविषयक लेखन आणि यातील लेखन यांचा तुलनात्मक अभ्यास करणे शक्य आहे. यातील लेखनावरून तत्कालीन नाट्याभिरुची, नाट्यविषयक वातावरण व त्याची वाङ्मयीन, सामाजिक, राजकीय कारणे यांबाबत विस्तृत विचार मांडता येईल. नाटक – एक व्यवसाय यादृष्टीने यात विपुल माहिती, विचार वाचावयास मिळतात. त्याच्या आधारे, रंगभूमी नियतकालीन नाट्यक्षेत्राशी संबंधित व्यक्ती आणि नाट्यव्यवसाय यांची समाजशास्त्रीय चिकित्साही करता येईल. या नियतकालिकातील एकूण लेखनाचा शैलीलक्षी अभ्यासही होऊ शकेल. अशाप्रकारे, विविधांगी स्वरूप असलेल्या या नियतकालिकाच्या एकेका पैलूवर लक्ष केंद्रित करून अभ्यास करणे शक्य आहे.

रंगभूमी नियतकालिकातील लेखांचे वर्गीकरण :

या नियतकालिकात आलेल्या मजकुरात विषयभिन्नता, प्रकारभिन्नता खूपच आहे. त्यामुळे त्याचे वर्गीकरण वेगवेगळ्या तऱ्हांनी करता येण्यासारखे आहे. आशयानुरूप, विषयानुरूप, लेखनप्रकारानुरूप असे प्रकार वर्गीकरणासाठी ठरविता येतील. पण काटेकोरपणे विचार केला तर प्रत्येक प्रकारात काही ना काही सूक्ष्म अडचणी येतील कारण यातील लेखनाचे मूळ स्वरूपच लेखनप्रकारांच्या दृष्टीने बहुविध आणि विषयांच्या व यात व्यक्त झालेल्या विचारांच्या दृष्टीने सरमिसळीचे आहे. अखेर महत्त्व असते ते विचारांना; केवळ वर्गीकरणाला नाही. या नियतकालिकाचे व्यापक स्वरूप ध्यानात घेण्याच्या दृष्टीने सोयीचे असे वर्गीकरण

प्रस्तुत प्रबंधात केलेले आहे. ते स्थूल पण आटोपशीर आहे. या वर्गीकरणातून नियतकालिकाची व्याप्ती समजावून घेण्याचा प्रयत्न केला आणि मग प्रबंधाचा विषय निश्चित ठरविला.

प्रबंधाचा विषय :

रंगभूमी नियतकालिकातील नाट्यसमीक्षा : एक चिकित्सक अभ्यास असा विषय प्रबंधलेखनासाठी ठरविला. कारण नाट्यसमीक्षा हा या नियतकालिकाचा गाभा आहे असे सर्व अंक वाचल्यानंतर स्पष्टपणे दिसून आले. सम् + ईक्ष् या धातूचा अर्थच मुळात सर्वांगाने पाहाणे असा आहे. या नियतकालिकातही समीक्षा केली गेली आहे ती व्यापक अर्थाने यात फक्त नाटकांची समीक्षा नाही तर एकूण मराठी नाट्यक्षेत्राचीच समीक्षा आहे. या समीक्षेचे गुणावगुण, मर्यादा व महत्ता यांचा अभ्यास करून काही निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न या प्रबंधात केलेला आहे.

प्रबंधाचे स्वरूप :

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात, प्रबंधाचा विषय, व्याप्ती, मर्यादा स्पष्ट करून, रंगभूमी नियतकालिकासंबंधी माहिती दिलेली आहे. या नियतकालिकाच्या प्रथमांकाचा परिचय करून दिलेला आहे. संपादकांनी अनेकदा स्वत:चे नाट्यविषयक विचार यात व्यक्त केलेले आहेत. तसेच हे नियतकालिक सुरू करण्यामागील भूमिका, प्रयोजन यासंबंधीही लिहिले आहे. या सगळ्याचा आढावा घेतलेला आहे. यातील लेखांचे वर्गीकरण आणि त्याचा थोडक्यात तपशील इ. भाग पहिल्या प्रकरणात आलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये इ.स. १८०० ते १९०७ या काळातील नाट्यसृष्टीतील घडामोडींचा विचार केला आहे. मराठी नाट्यपरंपरेच्या प्रारंभाविषयीची विविध मते, मराठी नाटकांची स्थित्यंतरे, समाजातील प्रतिष्ठितांनी नाट्यकलेला दिलेला पाठिंबा या सगळ्यांची नोंद घेतलेली आहे. रंगभूमी नियतकालिकपूर्व आणि समकालीन नियतकालिके, वृत्तपत्रे यातील नाट्यविषयक लेख आणि रंगभूमी नियतकालिकातील लेख यातील महत्त्वाचा भेद थोडक्यात सांगितला आहे. रंगभूमी नियतकालिकाचे वेगळेपण स्पष्ट करून ते नाट्यविचाराचे व्यासपीठ कसे होते ते दाखविले आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये या नियतकालिकातील नाट्यपरीक्षणांचे महत्त्व कोणते आहे याची चर्चा केली आहे. नाट्यविषयक महत्त्वाच्या संकल्पनांचा विचार मांडला आहे. नाट्यसमीक्षेचे स्वरूप कसे असते, नाट्यसमीक्षकाजवळ कोणती गुणवत्ता असली पाहिजे यासंबंधी विवेचन केले आहे. १८७५ ते १९२० या काळातील मराठी नाट्यसमीक्षेचा आढावा घेतलेला आहे.

चार, पाच, सहा या तीन प्रकरणांमध्ये, अनुक्रमे संस्कृत, इंग्रजी, मराठी नाटकांवर या नियतकालिकात जी परीक्षणे आलेली आहेत त्यांवर विवेचन केलेले आहे. संस्कृत आणि मराठी नाटकांवरील परीक्षणलेखांचा परामर्ष घेताना काही निवड केलेली आहे. निवडीचे निकष त्या ठिकाणी दिले आहेत. इंग्रजी नाटकांवरील परीक्षणलेखांचा धावता आढावा घेतला आहे कारण ते लेख संस्कृत व मराठी लेखांच्या तुलनेने फारसे सखोल स्वरूपाचे नाहीत.

प्रबंधविषयाच्या संदर्भात, नाट्यपरीक्षणे हे एक रूप आणि नाटक या विषयाच्या अनेक बाजूंचा विचार मांडणारे तात्त्विक स्वरूपाचे लेख हे दुसरे रूप, अशी दोन रूपे ध्यानात घेतलेली आहेत. नाट्यविचार व्यक्त करणाऱ्या लेखांचा परामर्ष सातव्या प्रकरणात विभागश: घेतलेला आहे. नाट्यविषयक तात्त्विक विचार ज्या लेखांमध्ये आहेत, त्यापैकी काही लेखांचा विचार एका गटात केलेला आहे. नटांचे शिक्षण, नाटकमंडळ्या इ. संबंधीचे विचार असलेल्या लेखांचा समावेश दुसऱ्या गटात केलेला आहे. नाट्यकलेची सुधारणा करण्याची जबाबदारी आणि नाटकाचा समाजावर होणारा परिणाम या विषयांचाही याच गटात समावेश केलेला आहे. कुलीन स्त्रियांनी रंगभूमीवर भूमिका कराव्यात की करू नयेत हा त्या काळातील एक मोठा चर्चेचा विषय होता, याबाबत मते व्यक्त करण्याचे आवाहन रंगभूमीकारांनी केलेले आहे. त्यानुसार ज्यांनी आपले विचार मांडले त्यांचा आढावा तिसऱ्या गटात घेतलेला आहे. भारतनाट्यसमाजाच्या संमेलनांमधून पुष्कळ नाट्यचर्चा होत असे. अध्यक्षीय भाषणातून नाट्यचिंतन होई, त्याचप्रमाणे काही निबंध मागविले जात. अशांपैकी दोन निबंधांचा आणि काही संमेलनाध्यक्षांच्या भाषणाचा परामर्ष चौथ्या गटात घेतलेला आहे. अशारितीने सातवे प्रकरण चार गटात विभागलेले आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी समारोपात त्या त्या प्रकरणाचे निष्कर्ष दिलेले आहेत.

प्रस्तुत प्रबंधाचे स्वरूप, रंगभूमी नियतकालिकातील काही भागाचे संकलन, संपादन आणि त्याचे समीक्षण असे आहे. म्हणून प्रथम, यात व्यक्त झालेल्या विचारातील मुख्य भाग मुळानुरूप देऊन, लगेच आवश्यक वाटले तेथे स्वत:च्या प्रतिक्रिया व मते व्यक्त केली आहेत. या पद्धतीमुळे मूळ सूत्र न सुटता सलग विवेचन करता आले. लेखांमधील ज्या ज्या मुद्यांचे खंडनमंडन करणे गरजेचे वाटले, ते, त्या त्या ठिकाणीच केल्यामुळे, एकेका लेखाचा विचार तेथल्या तेथेच पुरा झाला आहे. प्रबंधात सर्वत्र हीच पद्धती अवलंबिलेली आहे.

उपसंहारातील निष्कर्षांची रूपरेषा :

रंगभूमी नियतकालिकाचे स्वरूप समजावून घेतल्यावर, त्यातील नाट्यसमीक्षेचा अभ्यास केल्यावर हाती आलेले निष्कर्ष उपसंहारात मांडले आहेत. त्यात खालील मुद्दे आलेले आहेत :

१. रंगभूमी नियतकालिक हे एका नाट्यानुभवी, नाट्यप्रेमी व्यक्तीचे कर्तृत्व आहे. यादृष्टीने संपादकीय दृष्टीतील गुणावगुणांचा विचार.
२. नाट्यविचारांच्या संदर्भात, मराठीतील अन्य नियतकालिकांपेक्षा रंगभूमी नियतकालिकाचे वेगळेपण.
३. रंगभूमी नियतकालिकातील समीक्षेचे स्वरूपवैशिष्ट्य.
४. रंगभूमी नियतकालिकातील प्रयोगसमीक्षा : एक अनन्यसाधारण घटक
५. मराठी नाट्यसमीक्षेच्या इतिहासात रंगभूमी नियतकालिकाचे स्थान.
६. रंगभूमी नियतकालिकाचे कार्य व परिणाम.

पूर्वसूरींचे ऋण :

रंगभूमी नियतकालिकाचा जन्म ही मराठी नाट्यक्षेत्राच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. पण याकडे, अभ्यासकांचे, जायला हवे होते, तेवढे लक्ष गेलेले नाही. याला सन्माननीय अपवाद डॉ. रा. शं. वाळिंबे यांचा आहे. त्यांनी ‘मराठी नाट्यसमीक्षा : इ. १८६५ ते १९३५ या आपल्या ग्रंथात, कालानुक्रम सांभाळून नाट्यसमीक्षेचा इतिहास

सांगताना, रंगभूमी नियतकालिकाविषयी चर्चा केलेली आहे. ती मौलिक आहे. परंतु त्या आढाव्यातून या नियतकालिकाचे संपूर्ण मूल्यमापन होऊ शकलेले नाही. या नियतकालिकाचा विचार हा त्यांच्या ग्रंथातील एक भाग होता, त्यामुळे ती मर्यादा होतीच. याशिवाय, डॉ, वाळिंबे यांनी म्हटल्याप्रमाणे, या नियतकालिकाचे प्रत्येक पान कोणत्या ना कोणत्या तरी दृष्टीने महत्त्वाचे आहे. तीन-साडेतीन हजार पृष्ठांच्या संकीर्ण मजकुरातून वेचक भाग निवडून, या नियतकालिकाला खरा न्याय द्यायचा तर त्याच्या एकेका पैलूचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास करावा लागेल. ग्रंथातील एखाद्या भागातून किंवा एका प्रबंधातून ते काम पूर्ण होणार नाही. डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी या विषयाकडे लक्ष वेधले, त्याचे महत्त्व सांगितले हे त्यांचे ऋण आहे.

प्रस्तुत प्रबंधात, नाट्यसमीक्षा हा केंद्रबिंदू ठरवून घेऊन काही निष्कर्ष काढण्यापूर्वी, नाट्यसमीक्षेच्या ठळक संकल्पना प्रथम मांडलेल्या आहेत. यातील नाट्यसमीक्षेचा अभ्यास, काळाचे सूत्र ध्यानात घेऊन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. संस्कृत व मराठीतील ज्या नाटकांवर यात परीक्षणलेख आलेले आहेत, त्यांचा आढावा घेताना, त्यापैकी एकेक नाटक निवडून त्यांचा सविस्तर विचार मांडला आहे. या नाटकांवर वेगवेगळ्या काळात, मराठीत झालेली महत्त्वाची समीक्षा हेतुत: दिली आहे. उदाहरणार्थ या नियतकालिकात आलेल्या कालिदासाच्या ' शाकुंतल वरील लेखाचा परामर्ष घेताना, रवींद्रनाथ ठाकूर, डॉ. द. रा. बेंद्रे, वै. का. राजवाडे, प्रा. दि. के. बेडेकर, या ज्येष्ठ अभ्यासकांनी ' शाकुन्तल चे जे सौंदर्य उलगडून दाखविले आहे त्याचाही अंतर्भाव केला आहे. श्री. गो. वा, बापट यांचा ' नाटकविषयक व्यापक विचार हा तात्त्विक स्वरूपाचा दीर्घ निबंध रंगभूमी नियतकालिकात आलेला आहे. त्यातही कालिदासाच्या ' शाकुंतल चे संदर्भ आहेत. त्यांच्या परीक्षणलेखावर लिहिताना तो भागही विचारात घेतला आहे. यामुळे मराठीत झालेली ' शाकुन्तल ची महत्त्वाची समीक्षा येथे एकत्रितपणे मांडली गेली. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या 'म तिविकार या नाटकाचाही याच पद्धतीने परामर्ष घेतला आहे. प्रबंधाच्या मर्यादेत, प्रत्येक नाटकावर विस्तृत लिहिणे शक्य नव्हते म्हणून निवड करावी लागली. रंगभूमी नियतकालिकातील परीक्षणलेखांचा अशाप्रकारे अभ्यास यापूर्वी झालेला नाही. संहिता-समीक्षेच्या बाबतीत जसा हा वेगळ्या पद्धतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला तसा प्रयोग-समीक्षेच्या बाबतीतही दोन दृष्टिकोनांतून, उपसंहारात नव्याने काही निष्कर्ष व्यक्त केले आहेत. आजच्या काळाच्या तुलनेने या प्रयोगसमीक्षेकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

ंरंगभूमी नियतकालिकातील बहुतेक विचार आजही मूलगामी स्वरूपाचे, दूरदृष्टीचे कसे वाटतात यासंबंधी, त्याच्या कार्याचा आढावा घेताना उपसंहारात लिहिलेले आहे. १९२८ मध्ये हे नियतकालिक बंद पडले आणि १९३० ते १९५० या काळात मराठी रंगभूमी निश्चेष्ट झाली. त्यामुळे या नियतकालिकाचे महत्त्व नाट्याभ्यासकांच्या नजरेपुढे यावयास हवे होते तसे आले नाही. दुर्लक्षित, उपेक्षित अशा, या नियतकालिकाच्या कार्याचे मूल्यमापन, त्यातील नाट्यसमीक्षेवर भर देऊन करण्याचा प्रयत्न, हे प्रस्तुत प्रबंधाचे फलित म्हणावयास हरकत नाही.